औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयात कार्यरत असणाऱ्या प्रमाणक शल्य चिकित्सक यांना दि.१.४.२०१० ते ३०.६.२०१२ या कालावधीत, ६ व्या वेतन आयोगातील व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. औसुवआ-०७११/प्र.क्र.३७/कामगार-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:-०९ मे, २०१९

वाचा : १. वित्त विभाग, शासन अधिसूचना, क्र. : वेपुर १०१६/प्र.क्र.६९/सुधारणा-८२/सेवा-९, दि. २४.११.२०१६,
२. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्र.मवैअ-१००९/२३३/प्र.क्र.४५५/०९/ सेवा-३, दि.१.४.२०१० व,
३. उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा समक्रमांकाचा दि. २६.११.२०१८ चा शासन निर्णय.

शासन निर्णय :

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयात प्रमाणक शल्य चिकित्सक, गट-अ या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना संदर्भ क्र.३ येथील दि.२६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.१ जुलै, २०१२ पासून, सहाव्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीनुसार मूळ वेतनाच्या ३५% व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्यात आला आहे. या अनुषंगाने, त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसायरोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रु.८५०००/- पर्यंत मर्यादित ठेवण्यात आली आहे.

२. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयाप्रमाणे, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयात प्रमाणक शल्य चिकित्सक, गट-अ या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना दि.१ एप्रिल, २०१० ते दि.३० जून, २०१२ या कालावधीत सुधारीत दराने व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता शासनाने प्रमाणक शल्य चिकित्सक, गट-अ यांना सहाव्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीनुसार दि.१.४.२०१० ते ३०.६.२०१२ या कालावधीत, मूळ वेतनाच्या २५% व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतू, त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसायरोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रु.८५०००/- पेक्षा जास्त नसावी. सदर व्यवसायरोध भत्ता दि.१.४.२०१० ते ३०.६.२०१२ या कालावधीत प्रत्यक्षात अदा करण्यात आलेल्या वेतनावर लागू होईल.

३. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील प्रमाणक शल्य चिकित्सक, गट-अ यांना व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय करण्यात आल्यामुळे, उपरोक्त कालावधीत त्यांनी कोणत्याही प्रकारे खाजगी, स्वतंत्र व्यवसाय केलेला नाही, याची खातरजमा करण्याची जबाबदारी, संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांची राहील. तसेच, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याची कार्यपध्दती/यंत्रणा हि संदर्भ क्र.३ येथील दि. २६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आल्यानुसार राहील.

४. व्यवसायरोध भत्ता हा निवृत्तीवेतनाच्या परिगणनेसाठी आणि शासकीय निवासस्थानासाठी आकारण्यात येणाऱ्या सेवा शुल्काच्या परिगणनेसाठी विचारात घेण्यात यावा. याव्यतिरिक्त प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, घरभाडे भत्ता, शहर भत्ता वेतन निश्चिती इत्यादींसाठी व्यवसायरोध भत्ता हिशोबात धरण्यात येऊ नये. प्रमाणक शल्य चिकित्सक यांना शासन सेवेत कार्यरत असताना खाजगी वैद्यक व्यवसाय करण्याची अनुमती नाही. तथापि, निवृत्तीनंतर खाजगी वैद्यक व्यवसाय करण्यास बंधन नसल्यामुळे, निवृत्तीनंतर निवृत्तीवेतनात व्यवसायरोध भत्त्याचा समावेश असणार नाही.

५. ज्या लेखाशीर्षाखाली प्रमाणक शल्य चिकित्सकाच्या वेतन व भत्यापोटी येणारा खर्च, खर्ची टाकण्यात येतो, त्याच लेखाशीर्षाखाली व्यवसायरोध भत्याच्या पोटी येणारा खर्च देखील खर्ची टाकण्यात यावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय असलेला व्यवसायरोध भत्ता मूळ वेतनाशी निगडीत असल्याने शासनाच्या स्थायी आदेशानुसार ज्या कालावधीकरिता मुळ वेतन अदा केले जात नाही, अशा कालावधीसाठी व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक १२०/सेवा-५ दि.२६.१०.२०१८ अन्वये मिळविलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१९०५०९१५१९१६८०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Meghashyam Nawar

Digitally signed by Meghashyam Nawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7d2d0d7e2120f3814eff2bd1a5d3c902860ebecbe995c3b2260a01b762f45c3a, serialNumber=a5505efe2f8776471817f30ce3446f37d84d8aeddd35d8e3a76a12d1b08434dd, cn=Meghashyam Nawar
Date: 2019.05.09 15:22:59 +05'30'

(मेघःश्याम नवार)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रभारी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई,
२. महालेखापाल, महाराष्ट्र १, (लेखापरीक्षा)/ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. संचालक, लेखा व कोषागार, मुंबई,
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५. निवड नस्ती, (कामगार-१).